# शोनान

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**शोनान : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ ३१०/-

# शोनान

# १

## लांडगा आणि हरिणी

दोन घटका सतत पडत राहिलेला पाऊस ओसरून अखेर थांबला. ढग विरून गेले. आकाश स्वच्छ झालं. पश्चिम क्षितिजापासून अजून चार हात वर असलेल्या सूर्यबिंबाच्या किरणांची तांबूस सोनेरी झळाळी पावसानं ओल्या केलेल्या सृष्टीवर पसरली. पूर्वेकडच्या आभाळात इंद्रधनुष्याची अर्धीच कमान पुसट पुसट दिसू लागली.

सिंगापूर शहराबाहेरील जागोजागच्या राईतली रबराची उंच उंच झाडं सचैल न्हाऊन निघाली होती, आणि आता त्यांच्या फांद्यावरचं पाणी थेंबा थेंबानं ठिबकत होतं. घनदाट झाडीच्या अंतरंगात सूर्यप्रकाशाच्या सोन्याला जागा नव्हती, आणि उगवतीच्या कडेवर अस्पष्ट उठलेल्या धनुष्यकमानीचे सुंदर सप्तरंगही पर्णराजीच्या पडद्यातून दिसण्यासारखे नव्हते. रबराच्या झाडांच्या असंख्य रांगा स्वत:च निर्माण केलेल्या गुडुप अंधारात निर्विकारपणानं उभ्या होत्या. एखाद्या बादशाहाच्या जनान्यात पुरुषाचं पाऊल कधी पडू नये त्याप्रमाणे सूर्यकिरणांचा प्रवेश या घनदाट राईत कधी झाला नव्हता. जलवृष्टीला मात्र या ठिकाणी बंदी नव्हती. मलायातील हवामान असं चमत्कारिक की तिथे निराळा असा वर्षाऋतु नाहीच. इथे ग्रीष्म आणि वर्ष दोन्ही ऋतूंचा संचार आलटून पालटून सतत चालतो. उन्ह-पावसाची शिवाशिव नेहमीच सुरू असते. बारा महिने घटका दोन घटकांचा पाऊस व त्यानंतर उघडीप-हाच

मलायातल्या हवेचा नित्याचा धर्म. केव्हा पाऊस पडेल त्याचा नेम नाही, आणि पडेल तेव्हा दोन घटका पडून उघडीप झाल्यावाचून राह्यची नाही हेच इथल्या निसर्गाचं ठरलेलं स्वरूप. त्यामुळे रबराच्या राईतल्या उंच उंच झाडांना सचैल स्नानाची नित्याची सवय. मात्र त्यांची भिजलेली अगं उन्हानं वाळण्याऐवजी वाऱ्याच्या झोतानं काय वाळतील तेवढीच... रबराच्या झाडांच्या ओल्या खोडावर आणि फांद्यांवर फुंकर घालीत वारा खेळू लागला, किंवा जमिनीवर गळलेला पालापाचोळा लोटीत वारा सरपटू लागला, की त्याची चमत्कारिक शीळ राईराईतून धुमलेली ऐकू यायची.

आजही दोन घटका सतत गळत राहिलेला पाऊस थांबला, आभाळ निपटून निघालं, तेव्हा पश्चिमेकडची तांबूस सोनेरी किरणं रबराच्या दाट राईत शिरली नाहीत; किंवा पूर्वेकडे उमटलेल्या सप्तरंगी पट्ट्यांची शोभा राईतून दिसली नाही; परंतु फांद्याफांद्यावरून ठिबकणाऱ्या जलबिंदूंचे आवाज जसे जागोजागच्या पाचोळ्यातून उठू लागले त्याप्रमाणेच वाऱ्याची चमत्कारिक शीळही झाडांच्या रांगारांगातून फिरू लागली... दुसऱ्या महायुद्धाचा वणवा, जगात जागोजाग भडकला होता. युद्धोपयोगी साहित्य म्हणून लोखंड, पोलाद, कोळसा या वस्तूंप्रमाणेच रबराला महत्त्व आलं होतं. ज्यापासून सुखसोईच्या वस्तू आणि सुंदर सुंदर खेळणी तयार व्हायची त्या रबराचा उपयोग आता मानवी संहारासाठी धावणाऱ्या रणगाड्यांची व अंतरिक्षात घिरट्या घालणाऱ्या विमानांची चाकं बनविण्याकडे होत होता. रबर म्हणजे एक महत्त्वाचं संहारक अस्त्र बनलं होतं. परंतु या संहाराची रबराच्या रानातल्या या झाडांना दाद नव्हती. जगात ठिकठिकाणी भडकलेल्या महायुद्धाची ज्वाळा या झाडांच्या गावी नव्हती. हे उंच उंच वृक्ष जसे वर्षानुवर्षे उभे होते तसेच आजही उभे होते. अंधारात ! पावसात ! त्यांची भिजलेली अंगं वारा सुकवीत होता. चमत्कारिक शीळ घालीत राईत घुमत होता. या गर्द राईच्या अंधारात आणि ओलाव्यात जगभर पसरू पाहणाऱ्या महायुद्धाची चाहूल ऐकू येण्यासारखी नव्हती...

सिंगापूर शहराची गोष्ट मात्र वेगळी होती. शहराच्या कोणत्याही भागात हिंडणाऱ्या माणसाला युद्धकालीन परिस्थितीची जाणीव क्षणार्धात होण्यासारखी होती. आधीच सिंगापूर शहर म्हणजे अठरापगड जातींच्या व धर्मांच्या लोकांचं आश्रयस्थान ! हिंदी, ब्रह्मी, चिनी, जपानी, इंग्रज, अमेरिकन, फ्रेंच, जर्मन अशा सर्व देशातल्या स्त्री-पुरुषांचा वावर या शहरात नेहमीच दिसायचा. आणि आता तर काय



महायुद्धानं चारी खंडातली दुनिया ढवळून निघत होती. मुलकी आणि लष्करी लोक इतस्तत: फेकले जात होते. त्यामुळे सिंगापूर शहर आणखीनच बकाली बनलं होतं. गल्लीकुचीतून देखील जी धांदल आणि रहदारी चाललेली दिसत होती तिच्यात वेषभूषेच्या दहा तऱ्हा आढळत होत्या, आणि दहा भाषांचे चमत्कारिक शब्द व हेल ऐकू येत होते..... सिंगापूर शहरातील 'रॅफल्स प्लेस' नावाच्या मुख्य बाजारपेठेची गोष्ट तर विचारायलाच नको. स्त्री-पुरुषांची दाटी, परोपरीच्या वाहनांची वर्दळ, मधुनच वेगानं जाणाऱ्या लष्करी ट्रकची धडपड, नाना भाषातल्या आरोळ्या, गोऱ्या आणि काळ्या सैनिकांच्या बुटांचे आवाज, फेरीवाल्यांच्या ललकाऱ्या, यांनी त्या हमरस्त्याचं वातावरण गजबजून आणि कटकटून गेलेलं होतं. दोन घटकांच्या वृष्टीनंतर स्वच्छ झालेल्या आकाशाचा सुंदर निळा रंग, पश्चिमेच्या क्षितिजावर तळपणारा सोनेरी मुलामा, आणि पूर्वेच्या बाजूला पुसट उठलेल्या धनुष्यकमानीतल्या मनोहर रंगछटा बघायला सवड होती कोणाला ? जो तो धावत होता, पळत होता, गर्दीतून घुसत होता, 'हटो' 'हटो' म्हणत होता किंवा म्हणून घेत होता. जिकडे तिकडे कलकलाट आणि गर्दी उसळली होती. महायुद्धाच्या आघाड्या दूर होत्या परंतु सिंगापूर शहराच्या जीवनाचं शांततेच्या काळातलं नागरी स्वरूप पार लुप्त झालं होतं. सिंगापूरचा आरमारी तळ म्हणजे दोस्तांच्या सामर्थ्याची एक अभेद्य भिंत होती. या केंद्राच्या संरक्षणासाठी खूप मोठ्या फौजेचा मुक्काम सिंगापुरात होता. आणि या फौजी लोकांच्या निवासामुळे सिंगापूर शहराचं एकंदर जीवनच पार पालटून गेलं होतं. मुख्य बाजारपेठेच्या या हमरस्त्यात ओसंडून वाहणाऱ्या जीवनात युद्धकालीन परिस्थिती जागोजाग आपलं स्वरूप दाखवीत होती. सामान्य नागरिक अंग चोरून आदबीनं वावरत होते. पायातले बूट खाड खाड वाजविणारे, हातातल्या छड्या मस्तीनं फिरविणारे, क्वचित लहर आली की पाच-पाच सहा-सहा मिळून एखादं गीत शिटीत वाजविणारे, खाकी गणवेशातले गोरे सैनिक अरेरावीनं आणि ताठ्यानं स्वच्छंद हिंडत होते. जणू हा राजरस्ता, रस्त्यातली वाहनं, दुतर्फाची लहान मोठी दुकानं, सारं काही त्यांच्या विहारासाठी राखून ठेवलेलं होतं ! या ठिकाणी ते म्हणतील तो कायदा होता ! त्यांना हटकण्याची कुणाची प्राज्ञा नव्हती ! महायुद्ध चाललं होतं ते त्यांच्या बळावर ! मग त्यांच्या सुखसोई आधी पाहायला नकोत काय ? त्यांच्या तब्येती सगळ्यांनी सांभाळायला नकोत काय ?...

आज पगाराचा दिवस होता. खिशात पैसे भरून गोरे सैनिक आले होते. खरेदीसाठी, गमतीनं हिंडायसाठी, करमणुकीसाठी, चैनीसाठी ! हॉटेला-हॉटेलात त्यांची टोळकी शिरत होती, पीत होती, खात होती, बीभस्त विनोद करीत होती, हसत खिदळत होती. दुकाना-दुकानात हे सैनिक शिरत होते, हवं ते घेत होते, नको ते फेकीत होते, दुकानदाराशी हे सैनिक भांडत तंडत होते. चित्रपटगृहात त्यांनी गर्दी करून सोडली होती. आणि रस्त्यावरदेखील मुख्य दाटी होती ती त्यांचीच. जणू सिंगापूरची ती भव्य बाजारपेठ त्यांच्यासाठीच वसलेली होती. दुकानं, हॉटेल, चित्रपटगृह, रस्त्यावरील वाहनं, आणि गल्लीकुचीतल्या वेश्या हे सारं काही त्या सैनिकांच्या स्वच्छंद विहारासाठी ठेवलेलं होतं. त्यांच्या तब्येती खुष राहिल्या पाहिजेत ! सिंगापूरच्या अभेद्य तळाचं रक्षण करण्याची कामगिरी करून थकलेल्या, शिणलेल्या या इंग्रज आणि ऑस्ट्रेलियन सैनिकांच्या मजेत न्यून राहता कामा नये. त्यांची प्रत्येक लहर सर्वांनी संभाळली पाहिजे. जो न संभाळील त्याला शासन करण्याचा अधिकारही त्यांच्याच हाती होता...

एका टॅक्सीवाल्याला हाताची खूण करून सोजिरांच्या एका टोळीनं थाबविलं. ते कुठे जायचं म्हणत होते ते त्या सिख ड्रायव्हरला कळेना. पण थोड्या वेळानं त्याच्या लक्षात आलं की 'व्हिक्टरी' थिएटरवर सिनेमा पाहण्यासाठी त्यांना जायचं होतं. मग त्यानं मीटरची दांडी पाडली आणि साहेबांना गाडीत बसायला सांगितलं. त्या टोळक्यात आठ सोजीर होते, ते सगळेच गाडीत बसले. सिख ड्रायव्हरनं सांगितलं इतक्या लोकांना नेता येणार नाही. त्याचं ते उत्तर ऐकल्याबरोबर ते गोरे सैनिक त्याला शिव्या देऊ लागले आणि छड्या पाजळू लागले. कायद्याच्या गोष्टी कोणाला सांगत होता हा पागल ! सिंगापूरच्या प्रचंड आरमारी तळावर ज्यांचा पहारा होता त्यांना ! बेवकूफ हैवान ! कुत्ता ! सुवर ! चांगला झोडपला पाहिजे वेताच्या छड्यांनी याला !... अंगावर छड्या बसू लागल्या तेव्हा त्या सिख ड्रायव्हरनं गाडीखाली उडी मारली, आणि तो ओरडत ओरडत ''पोलीस ! पोलीस !'' अशा हाका मारीत धावत सुटला. चौकातल्या पोलिसाजवळ जाऊन त्यानं आपलं गाऱ्हाणं सांगितलं, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. उलट रहदारीचं नियंत्रण करण्यात गुंतलेल्या त्या पोलिसाच्या चार शेलक्या शिव्या त्याला खाव्या लागल्या. सोजिरांपैकी एक जण ड्रायव्हिंग सीटवर बसला आणि त्यानं गाडी हवी तशी सुरू केली. सिख ड्रायव्हर हाका मारीत बोंब ठोकीत गाडीमागे धावला...



एके ठिकाणी चिटाचं कापड विकणाऱ्या फेरीवाल्याभोवती दहा बारा सैनिकांचा गराडा पडला होता. कापडाच्या भावाची हुज्जत चालली होती. हव्या त्या किंमतीला कापड देण्यास फेरीवाला कबूल होईना. तेव्हा एका सोजिरानं त्याच्या तोंडावर गुद्दे लगावून त्याला खाली पाडलं. इतरांनी शिव्या देत त्याचा माल इकडे तिकडे फेकला आणि तुडविला. दोघा सोजिरांनी तीन मोठाले तागे उचलून घेतले. आणि त्या ताग्याची मिरवणूक काढल्याप्रमाणे त्या सैनिकांचं टोळकं बँडच्या चालीवर एक गीत मोठ्यांदा म्हणत 'लेफ्ट राईट' करीत रस्त्यानं निघालं. तोंडातलं रक्त थुंकीत पडलेल्या विक्रेत्याभोवती माणसांची गर्दी जमा झाली. माणसांची कसली ? मेंढरांचीच ! प्रतिकाराची शक्ती एकाच्याही अंगी नव्हती, साऱ्यांनी विक्रेत्याची दया केली आणि नशिबाला हात लावला. महायुद्धाच्या धुमश्चक्रीचे दिवस होते ते. या दिवसात असंच चालायचं. शहाण्या माणसानं रस्त्यावर उभं राहून माल विकू नये हेच खरं...

बाजारपेठेच्या या हमरस्त्यावर असले प्रकार नित्याचेच झाले होते. त्याकडे कुणी विशेष लक्ष देऊ नये असा संकेतच निर्माण झाला होता. तो संकेत मानूनच नागरिक रस्त्यानं हिंडत असत, आपापले व्यवहार करीत असत. दुकानदार आपला धंदा चालवीत असत, गाडीवाले, रिक्षावाले आपापली वाहनं हाकीत असत, ओढीत असत. गोऱ्या सोजिरांकडून मारपीट व जुलूम होण्याचा संभव असे, पण त्यापेक्षाही कमाई होण्याचा अधिक संभव असे. या कमाईच्या लोभानं जो तो आपला धंदा करीत होता. साऱ्यांच्या मागं पोट लागलं होतं !

वर आकाशात एका बाजूस विखुरलेली सूर्यास्ताची तांबूस सोनेरी शोभा आणि दुसऱ्या बाजूस उमटलेली सप्तरंगाची अर्धी कमान बघण्याची इच्छा आणि सवड होती कुणाला ?...

शहरापासून दूरच्या रानातल्या अंधारात आणि ओलाव्यात उभ्या असलेल्या रबराच्या वृक्षांना ज्याप्रमाणे अंतरिक्षातली किमया दिसत नव्हती, त्याप्रमाणेच सिंगापूरच्या राजरस्त्यात वावरणाऱ्या या जनसंमर्दाला देखील डोळे असूनही ती पाहावीशी वाटत नव्हती. माथ्यावरच्या आकाशात निसर्गाचे भव्य दिव्य खेळ चालू होते. परंतु बाजारपेठेत ज्यांचा गजबजाट आणि गोंधळ माजला होता त्या माणसांना निसर्गाची क्रीडा पाहण्यासाठी नजर उंच करावीसं वाटत नव्हतं. फौजी लोक

आपल्याच मस्तीत आणि धुंदीत होते म्हणून ! नागरी लोक 'मुकी बिचारी कुणी हाका' कोटीतले होते म्हणून !

एका मोठ्या दुकानातून बाहेर पडलेली एक तरुण स्त्री मात्र पायऱ्या उतरता उतरता थबकली, आणि पूर्वेच्या क्षितिजाकडे बघत उभी राहिली चकित झाल्याप्रमाणे ! जे दिसत होतं ते नजरेनं आकंठ पिण्याची तहान लागल्याप्रमाणे ! इंद्रधनुष्याच्या कमानीतले रंग हळूहळू विरत होते. जणू ते रंग म्हणजे कसला तरी द्रव पदार्थ होता आणि वाऱ्याच्या फुंकरानं तो वाळून जात होता. किंवा ते रंग म्हणजे जणू आकाशमार्गाच्या त्या भागावरून धावत गेलेल्या अप्सरांच्या पावलांनी उमटविलेल्या खुणा होत्या आणि कुणाच्या तरी नाजुक हातानं त्या पुसल्या जात होत्या. रंगीबेरंगी धनुष्याची ती अर्धी कमान झपाट्यानं अदृश्य होत असलेली बघून दुकानाच्या पायऱ्यावर थबकलेल्या त्या तरुण स्त्रीच्या मुद्रेवरचा आनंदही किंचित ओसरला. समोर आकाशात जे दिसत होतं ते अत्यंत मनोहर होतं, परंतु आपण ते पाहण्यात फार उशीर केला याचा तिला खेद झाला आणि आता तरी धनुष्याच्या त्या अपूर्व शोभेची लूट नजरेनं शक्य तितकी करावी अशा विचारानं ती अगदी निरखून बघू लागली... निसर्गानं चितारलेल्या चित्राकडे बघता बघता ती स्वत:च एखाद्या चित्रासारखी निश्चल झाली...

इंद्रधनुष्याचे रंग विरून गेले तरी देखील ते अजून दिसत आहेत असा भास तिच्या दृष्टीनं निर्माण केला, आणि ती बघतच राहिली. पळभरानं आकाशफलकावरचं धनुष्याचं ते रंगीत चित्र संपूर्णत: पुसलं गेलं हे तिला मान्य करावं लागलं. मग मात्र तिनं एक निश्वास सोडला आणि नजर वळविली. आपण दुकानाच्या पायऱ्यावर थबकून उभ्या आहोत हे तिच्या लक्षात आलं...

त्याच क्षणी जिकडे तिकडे विजेचे दिवे लागले !... संध्येच्या प्रकाशात विजेचा लखलखाट मिसळला. जणू काचपात्रात दोन प्रवाही द्रव्य मिसळली गेली ! आणि दोहोंचा मिळून काही एक चमत्कारिक प्रकाश वातावरणात पसरला ! ती तरुण स्त्री काही वेळ जागच्या जागीच उभी राहिली. मग आकाशाच्या ज्या भागात इंद्रधनुष्याचे रंग दिसले होते त्या भागाकडे तिनं एकदा बघितलं, पश्चिमेच्या क्षितिजाकडे नजर टाकली. जी शोभा थोड्या वेळापूर्वी आपण पाहिली ती आता पुन्हा दिसणार नाही अशी खात्री झाल्यावर तिनं एक निश्वास सोडला. आणि ती जागची



हलली. जणू मेणाच्या प्रदर्शनातल्या निश्चल बाहुलीचीच हालचाल झाली... उतरलेल्या चार पायऱ्यावरून अगदी सावकाश जड पावलं टाकीत उतरून रस्त्यात उभं राहून तिनं इकडे तिकडे पाहिलं. जणू अमक्याच दिशेला जायचं असा तिचा मनाचा निश्चय होत नव्हता, आणि कुणीकडे जावं याचा ती विचार करीत होती.

''हॅलो !'' असा शब्द तिला ऐकू आला म्हणून तिनं वळून पाहिलं.

एक तरुण गोरा सैनिक तिच्यापुढे उभा होता.

त्यानं पुन्हा 'हॅलो' असं म्हटलं, आणि तिची व त्याची नजरभेट झाल्याबरोबर तो हसला. ''हॅलो बेबी.''

त्याच्या अभिवादनाचं किंवा बोलण्याचं तिला आश्चर्य वाटलं नाही. ज्या बायकांना गोऱ्या सैनिकांशी अशा प्रकारे हटकावं अशीच इच्छा असे अशा बायका संध्याकाळच्या वेळेस सिंगापूरच्या बाजारपेठेत या दिवसात हिंडत असत. लष्करातले गोरे लोक घडीभरच्या चैनीसाठी शहरात येत असत, आणि त्यांना हवी असलेली चैन पुरविणाऱ्या बाजारबसव्यांचा जसा मोहोल्ला होता त्याचप्रमाणे त्यांना आपल्या निवासस्थानी घेऊन जाण्यासाठी सहल करणाऱ्या अधिक फॅशनेबल बायकाही होत्या... त्या सोजिरानं हटकल्याबद्दल त्या तरुण स्त्रीला आश्चर्य वाटलं नाही किंवा रागही आला नाही. मात्र 'तुझा अदमास चुकला बाबा' अशा अर्थाची काहीशी रुष्ट चर्या करून तिनं नजर फिरविली आणि ती थोड्या घाईनं दूर होऊन चालू लागली.

तो गोरा सैनिक पाठोपाठ येत आहे की काय ते बघावसं तिला वाटलं. परंतु तितक्यात मनात आलं की आपण मान वळवून बघितलं तर त्याचा निराळाच अर्थ होण्याचा संभव आहे. तिनं परतून बघितलं नाही. ती फक्त झपाझप चालत राहिली. ''पळू नकोस. उभी राहा. माझ्याजवळ पैसे आहेत.'' असे त्याचे शब्द आणि त्याचं हसणं तिला ऐकू आलं. त्याच्या बुटांचा खाडखाड आवाज पाठोपाठ जलद गतीनं येत असल्याचं तिच्या लक्षात आलं.... मग ती धावू लागली. लांडग्याचा पाठलाग चुकविण्यासाठी धावणाऱ्या एखाद्या हरिणीप्रमाणे ! तिच्या डाव्या अंगाला मोठमोठी दुकानं होती. त्यात दिव्यांचा झगमगाट दिसत होता. माणसं आत जात होती, बाहेर येत होती. तिला एकदा वाटलं एखाद्या दुकानात झटकन शिरावं. परंतु दुकानात आपण शिरलो तर तो गोरा सोजिरही मागोमाग शिरेल आणि आपण त्याच्या..... तिनं तो विचार मनावेगळा केला आणि त्याच्यापासून फक्त शक्य तितकं दूर जाण्याचा विचार